॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रोकोली, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०७ वा | सोमवार, दि. २३ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# वादळी वारे, गारांच्या पावसाने शेतकऱ्यांचे कष्ट मातीत

## सोलापुरात बळीराजाच्या डोळ्यात पाणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात गुरुवारी (ता. १९) सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिटीने बळीराजावर अक्षरशः दुहेरी आघात केला. गुढीपाडव्याच्या सणाच्या दिवशीच निसर्गाच्या या अवकाळी प्रकोपामुळे द्राक्ष, आंबा, ज्वारी, गहू, हरभरा आणि कांदा या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला आहे.

दिवसभर कडक उन्हामुळे वातावरण तापलेले असतानाच सायंकाळी पाचनंतर अचानक हवामानात बदल झाला. विजांच्या कडकडाटासह सुरू झालेल्या पावसाने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या पावसात अनेक ठिकाणी जोरदार वारे आणि गारपीटही झाली. यामुळे शेतातील उभी पिके अक्षरशः जमीनदोस्त झाली.

उत्तर सोलापूर तालुक्यातील पडसाळी येथील शेतकरी अंकुश सिरसट यांच्या द्राक्षबागेला या वादळाचा सर्वाधिक फटका बसला. रात्री सव्वा अकराच्या सुमारास आलेल्या वादळात त्यांची तीन एकर द्राक्षबाग पूर्णपणे कोसळली. यंदा द्राक्षाला चांगले बाजारभाव मिळत असतानाच, डोळ्यांदेखत सुमारे ५० लाखांचे नुकसान झाल्याने सिरसट कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्याचबरोबर बेदाणा तयार करण्यासाठी ठेवलेल्या रॅकवरील सुमारे ६० ते ८० लाख रुपयांच्या मालाचेही मोठे नुकसान झाले आहे.

माढा तालुक्यातील विठ्ठलवाडी, उपळाई खुर्द, मोडनिंब परिसरातही गारपिटीने थैमान घातले. विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसामुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काढणीस आलेली पिके पूर्णपणे मातीमोल झाली आहेत. बार्शी तालुक्यातील वैराग आणि पानगाव पट्ट्यातही अवकाळी पावसाने कहर केला. वैराग, काळेगाव, पिंपरी साकत या भागातील उभी



पिके भुईसपाट झाली असून सुगीचा हंगामच कोलमडला आहे.

उपळाई खुर्द परिसरात आंब्याचा मोहोर मोठ्या प्रमाणात गळून पडला असून चिकूची फळेही झाडावरून खाली कोसळली आहेत. त्यामुळे फळबागधारक शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि मजुरांची मोठी धावपळ उडाली. अनेक ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली.

दरम्यान, या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी माढा, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. शासनाने त्वरित मदतीचा हात दिला नाही, तर आधीच कर्जाच्या ओज्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या नैसर्गिक आपत्तीने पुन्हा एकदा बळीराजाचे कंबरडे मोडले असून, सणाच्या आनंदावर विरजण पडले आहे. आता शासनाकडून तातडीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बेलाटीत गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर राम मंदिराचे भूमिपूजन व भक्त निवास लोकार्पण

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील श्री संत सद्गुरू बाळूमामा मंदिर परिसरात गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर राम मंदिराचे भूमिपूजन व भक्त निवास लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. नववर्ष प्रतिपदा गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर अयोध्येच्या धर्तीवर नियोजित श्रीराम मंदिर साकारण्याचा मानस अध्यक्ष पाटील यांनी व्यक्त केला असून, याचा शुभारंभ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या प्रमुख उपस्थितीत तर धनगर समाजाचे आराध्य दैवत महालिंगराया मंदिराचे पुजारी व लेखक कविवर्य आडव्याप्पा महाराज वडियार (हुलजंती) यांच्या हस्ते भक्त निवासाचा लोकार्पण सोहळा करण्यात आला.



या कार्यक्रमासाठी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने, महानगरपालिकेचे गटनेते नरेंद्र काळे, तसेच येथे नव्याने बांधण्यात आलेल्या गोशाळेचे भूमिपूजन मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ज्ञानसंपदा शाळेचे संस्थापक सिद्धारूढ बेडगनूर यांनी आपल्या ६० मुलांचे लेझीम पथक स्वखर्चाने मंदिरात आणून सांस्कृतिक कार्यक्रम घेतला. या भागातील नागरिक व भाविकांना शेकडो किलोमीटर जाणे शक्य नाही. या ठिकाणी लोकांच्या दर्शनाची सोय व्हावी,, तसेच या ठिकाणी उभारण्यात आलेल्या बाळूमामा मंदिराचे देखील दर्शन घ्यावे, या उद्देशाने हे मंदिर साकारण्यात येणार आहे. या ठिकाणी पाडव्यादिवशी आयोजित कार्यक्रमात बाल कीर्तनकार शंभूराजे महाराज गुंड यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम झाला. यासाठी शेकडो भाविकांची उपस्थिती होती. या भूमिपूजन सोहळ्यासाठी पालकमंत्री व स्थानिक आमदार तसेच विविध संत व महान महंतांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

## सोलापूरच्या कापड उद्योगास ५०० कोटींचा फटका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युद्धामुळे थांबलेली निर्यात, देशांतर्गत बाजारातील घटलेली मागणी, शिपमेंटचे पाच पटीने वाढलेले चार्जेस, कच्च्या मालाची प्रचंड महागाई या प्रकाराने सोलापूरच्या वस्त्रोद्योगास अंदाजे ५०० ते ७०० कोटी रुपयांचा फटका बसला आहे.

युद्ध पंधरवड्यापेक्षा अधिक लांबल्याने वस्त्रोद्योगावर देखील वाईट स्थिती आली आहे. याचा थेट परिणाम कामगारांच्या रोजगारावर होण्याची भीती आहे.

शहरातील वस्त्रोद्योगात अनेक प्रकारची उत्पादने घेतली जातात. यामध्ये सोलापुरी चादरी, टेरी टॉवेल, युनिफॉर्म, गारमेंट, होजिअरी, इथिनिक व फॅन्सी वेअर्स आदी उत्पादनांचा समावेश आहे. युद्ध लांबल्याने अनेक प्रकारचे परिणाम समोर आले आहेत. पॉलिस्टर व पॅकिंग मटेरियलचे भाव ३५ टक्क्यांनी वाढले. त्यामुळे उत्पादन निर्मितीचा खर्च वाढला. निर्यातीच्या बाबतीत युद्ध थांबेपर्यंत निर्यातदार एजंट कोणत्याही नव्या ऑर्डर स्थानिक उत्पादकांकडून घेतल्या जात नाहीत. त्यामुळे करोडो रुपयांचे उत्पादन ठप्प झाले आहे. आखाती देशातील कतार, ओमान, युएई, ईराण, इराक, सौदी अरेबिया, बहरीन या देशातील निर्यात पूर्णपणे थांबली आहे.



**उत्पादननिहाय अडचणी**

**सोलापुरी चादर :** यंत्रमागधारक उद्योजकांकडून सोलापुरी चादर तयार केली जाते. या चादरीच्या उत्पादनावर देखील युद्धाचे सावट पसरले आहे. पेरॉक्साईड, रंग, पॅकिंग प्लॅस्टीक मटेरियलचे वाढलेल्या भावाचा उत्पादनास फटका बसला आहे.

**टेरी टॉवेल :** टेरी टॉवेलच्या नियार्तीवर युद्धाचे सावट आहे. युद्धातील धोका म्हणून शिपमेंटचे चार्जेस पाच ते सहा पटीने जास्त घेतले जात आहे. त्याचा फटका उत्पादकांना बसतो आहे. आखाती देशातील एकूण नियार्तीच्या अंदाजे १५ ते २० टक्के निर्यात थांबली आहे.

**युनिफॉर्म :** आफ्रिका व अन्य देशातील युनिफॉर्मच्या निर्यातीच्या बाबतीत वाहतुकीच्या अडचणी आहेत. निर्यातदार एजंट उत्पादकांचा माल युद्धामुळे खरेदी करण्यास तयार नाहीत. तसेच कच्च्या मालाचे दर वाढल्याने देशांतर्गत असलेली मागणी पुरवताना जादा दराचा फटका उद्योगाला बसला आहे.

### कच्च्या मालाच्या महागाईचा भडका


- कापड उद्योगात युद्धामुळे पेट्रोलियम उत्पादनाचा बेस असलेल्या कच्च्या मालाचे दर वाढले आहेत.
- पेरॉक्साईडचे दर ३३ रुपये होते ७० रुपये झाले
- पॅकिंग प्लास्टिक १०० रुपये किलो होते ते आता २०० रुपये किलो झाले आहे
- रंगाचे भाव ६०० रुपये किलो होते ते १ हजार रुपयांवर गेले आहेत.
- पॉलिस्टर सिंथेटिक यार्नची किंमत २० टक्क्यांनी वाढली आहे.

## सोलापूरकरांनो पाणी जपून वापरा !

### गळती दुरुस्तीमुळे पाणीपुरवठा पुन्हा एक दिवस पुढे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एकीकडे शहराच्या विस्कळीत पाणीपुरवठ्यावर सत्ताधाऱ्यांसह विरोधकातून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत असतानाच दुसरीकडे रेल्वे प्रशासनाने दुरुस्ती कामासाठी परवानगी दिल्यानंतर गळती लागलेली पाईपलाईन दुरुस्त करण्यात येत असल्याने पाण्याचा पुरवठा रोखण्यात येणार आहे.

यामुळे शहराचा पाणीपुरवठा पुन्हा एका रोटेशनसाठी एक दिवसाने पुढे ढकलण्यात येत



असल्याची माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिका पाणीपुरवठा अंतर्गत जुळे सोलापूर एम. बी. आर. उंचावरील टाकीवरून पाणीपुरवठा करणारी मुख्य पिण्याची पाईपलाईनआसरा पुलालगत कल्याण नगर जवळ रेल्वे रुळाशेजारी नादुरुस्त झाली आहे. यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती होत आहे.

या गळती दुरुस्तीचे काम रेल्वे विभागाच्या संमतीने सोमवार, २३ मार्च रोजी सोलापूर महापालिकेमार्फत हाती घेण्यात येणार आहे. दुरुस्तीचे काम करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्यामुळे जुळे सोलापूर एम. बी. आर. उंचावरील टाकीवरून २३ मार्चपासून होणारा पाणीपुरवठा एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन देखील पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. यामुळे शहराचा पाणीपुरवठा पुन्हा यापुढे विस्कळीत राहणार आहे.

## नागरिकांना घरबसल्या मिळणार दस्ताची प्रमाणित प्रत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने सातारा जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू केलेली 'ई-प्रमाण' सुविधा यशस्वी ठरली असून, आता पुढील दोन महिन्यांत ती राज्यभर लागू होण्याची शक्यता आहे.

यामुळे सोलापूरसह संपूर्ण राज्यातील नागरिकांना नोंदणीकृत दस्ताची डिजिटल स्वाक्षरी केलेली प्रमाणित प्रत घरबसल्या ऑनलाइन

नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन

मिळणार आहे.

या सेवेमुळे १९८५ पासूनचे दस्त पोर्टलवर उपलब्ध होतील. विशेष म्हणजे, केवळ दस्त क्रमांकाच्या आधारे बँकांना दस्ताची सत्यता पडताळता येणार आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे सर्व व्यवहारांची सुरक्षित नोंद होणार असल्याने फसवणुकीचे प्रकार रोखण्यास मदत होणार आहे.

**अशी होती जुनी पद्धत**

दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अर्ज करावा लागत असे. ई-चलनाद्वारे फी भरावी लागत असे. अभिलेख कक्षातून दस्त शोधून प्रत तयार केली जात असे. अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन प्रमाणित प्रत मिळत असे.

**पद्धतीचे फायदे**

'ई-प्रमाण'द्वारे दस्ताची प्रमाणित प्रत ऑनलाइन उपलब्ध प्रत्येक पानावर डिजिटल स्वाक्षरी कागदी प्रतीइतकेच कायदेशीर महत्त्व 'ग्रीन टिक'द्वारे सत्यता पडताळणी वेळ, श्रम आणि खर्चात बचत

## हर्षवर्धन सदगीर बनला सातवा डबल महाराष्ट्र केसरी

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील वाघोली, तालुका हवेली इथं सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा सुरु आहे. महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना महेंद्र गायकवाड आणि हर्षवर्धन सदगीर यांच्यात झाला.

हर्षवर्धन सदगीर यानं महेंद्र गायकवाड याला 4-2 असं पराभूत केलं. या विजयासह हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला.

महेंद्र गायकवाड यानं पहिल्या हाफमध्ये 1 गुण मिळवत आघाडी घेतली. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं एक गुण मिळवत बरोबरी केली. पहिला हाफ संपेपर्यंत 1-1 असा सामना बरोबरीत होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याला



एक्टिव्हिटी टास्क देण्यात आला, यात त्याला गुण मिळवता आला नाही. यामुळं हर्षवर्धन सदगीरला एक गुण मिळाला. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं दोन गुण मिळवले. अशा प्रकारे हर्षवर्धन सदगीर यानं 4-1 अशी आघाडी मिळवली.यानंतर हर्षवर्धन सदगीर बाहेर गेल्यानं एक गुण महेंद्र गायकवाडला मिळाला. कुस्तीचा वेळ संपला तेव्हा हर्षवर्धन सदगीर यानं 4-2 असा विजय मिळवला.

महेंद्र गायकवाड यानं माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा पराभव केला. तर हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा गादी विभागातील अंतिम फेरीत केला. यामुळं महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड आमने सामने आले.

### माती विभागात महेंद्र गायकवाड विजयी

माती विभागाच्या अंतिम फेरीत सोलापूर जिल्ह्यातून महेंद्र गायकवाड आणि हिंगोली जिल्ह्यातून सिकंदर शेख आमने सामने आले होते. या कुस्तीत महेंद्र गायकवाड यानं 3-0 असा विजय मिळवला. पहिल्या हाफमधील पहिल्या मिनिटातच महेंद्र गायकवाड यानं 2 गुण मिळवले. यानंतर पुन्हा एकदा महेंद्र गायकवाड यानं 1 गुण मिळवला. पहिल्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड 3-0 अशा आघाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याच्या विरोधात सिकंदर शेख यानं गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, सिकंदर शेख याला गुण मिळवण्यात अपयश आलं. यामुळं महेंद्र गायकवाड यानं मॅटवर होणाऱ्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

### मॅट विभागातील अंतिम फेरीत हर्षवर्धन सदगीर विजयी

मॅट विभागातील अंतिम फेरीची लढत सोलापूर शहरकडून खेळणाऱ्या जय पाटील आणि नाशिककडून खेळणाऱ्या हर्षवर्धन सदगीर यांच्यात झाली. हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा 10-0 असा पराभव केला.

## शहरासह तालुक्यात अवैध धंद्यांचे पुन्हा एकदा डोके वर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :** शहरासह तालुक्यात अवैध धंद्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढल्याचे चित्र समोर येत असून, स्थानिक प्रशासन आणि गुन्हे शाखेच्या निष्क्रियतेमुळे बेकायदेशीर व्यवसायांना जणू मोकळे रान मिळाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

शहरातील मुख्य मार्गावर उघडपणे दारू विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या प्रकारामुळे कायद्याचा धाक उरला आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विशेषतः शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातही अशा प्रकारे खुलेआम दारू विक्री होत असल्याने पालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

दरम्यान, कुरुल रोड परिसरात मटका जुगार मोठ्या प्रमाणावर बिनबोभाट सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणावर पैशांची उलाढाल होत असून, स्थानिक पातळीवर काही मंडळींना याचा आश्रय असल्याचीही



चर्चा आहे. पोलिस प्रशासनाला या प्रकाराची माहिती असूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

सोलापूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या कथित निद्रिस्त अवस्थेमुळे थेट कारवाईची प्रथा जवळपास संपुष्टात आल्याचे चित्र आहे. पूर्वी अचानक छापे टाकून अवैध धंद्यांवर लगाम घालणारी यंत्रणा आता निष्क्रिय झाल्याचे जाणवत आहे. त्यामुळे अवैध दारू विक्री, मटका, तसेच इतर बेकायदेशीर व्यवहार पुन्हा फोफावू लागले आहेत.

यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरुण पिढी या अवैध व्यवसायांच्या विळख्यात अडकत असल्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी संबंधित यंत्रणांनी तात्काळ लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मोहोळ शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्यथा परिस्थिती आणखी बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# स्वातंत्र्य की नियंत्रण

धर्म, ओळख आणि सत्ता यांचे परस्पर संबंध लक्षात घेतले, तर महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 या विधेयकाचे विश्लेषण करताना संतुलित आणि समालोचनात्मक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक ठरते. या विधेयकाचा मुख्य उद्देश जबरदस्ती, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे होणारे धर्मांतर रोखणे हा सांगितला जातो. वरकरणी पाहता हा उद्देश लोकशाही मूल्यांशी सुसंगत वाटतो, कारण कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होऊ नये, हे राज्याचे कर्तव्य आहे. मात्र, या उद्देशाच्या अंमलबजावणीतून निर्माण होणारे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे आहेत.
भारतीय समाजात धर्म हा केवळ श्रद्धेचा विषय नसून तो सामाजिक ओळख, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक स्थानाशी घट्ट जोडलेला आहे. त्यामुळे धर्मांतर ही केवळ वैयक्तिक निवड नसून ती सामाजिक परिणाम घडवणारी प्रक्रिया आहे. इतिहासात पाहिले असता, अनेक वंचित समुदायांनी धर्मांतराचा वापर सामाजिक सन्मान, समानता आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी केला आहे. दलित आणि आदिवासी समाजासाठी धर्मांतर हे अनेकदा दडपशाहीतून मुक्त होण्याचे साधन ठरले आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 चा विचार केला तर समर्थकांचे म्हणणे असे आहे की काही ठिकाणी गरीब, आदिवासी किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आर्थिक किंवा सामाजिक प्रलोभने देऊन धर्मांतरास प्रवृत्त केले जाते. त्यामुळे त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आघात होतो आणि अशा अनैतिक धर्मांतराला रोखण्यासाठी कायदेशीर चौकट आवश्यक आहे. त्यांच्या मते, हा कायदा व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी आहे. परंतु या भूमिकेच्या समोर विरोधक काही गंभीर प्रश्न उपस्थित करतात. प्रलोभन, जबरदस्ती आणि फसवणूक या संकल्पनांची व्याख्या अत्यंत अस्पष्ट आहे.

उदाहरणार्थ, जर एखादी संस्था शिक्षण, आरोग्य सेवा किंवा आर्थिक मदत देत असेल आणि त्यातून काही लोक प्रभावित होऊन धर्म बदलत असतील, तर ते प्रलोभन ठरेल का? की ते सामाजिक सेवा मानायचे? या संकल्पनांची स्पष्ट व्याख्या नसल्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीत मनमानी होण्याची शक्यता वाढते.

जेव्हा कायद्याच्या संकल्पना अस्पष्ट असतात, तेव्हा त्या सत्ताधार्यांच्या व्याख्यांवर अवलंबून राहतात. यामुळे कायदा संरक्षणाचे साधन न राहता नियंत्रणाचे साधन बनण्याचा धोका निर्माण होतो. या संदर्भात राज्यसत्तेची भूमिका अधिक स्पष्ट होते.

सत्ता ही केवळ दडपशाहीद्वारे कार्यरत नसते, तर ती नियमन, नियंत्रण आणि निरीक्षणाद्वारेही कार्य करते. धर्मांतरविरोधी विधेयक हे अशा प्रकारच्या नियामक सत्तेचे उदाहरण ठरते. जेव्हा राज्य व्यक्तीच्या वैयक्तिक श्रद्धांवर आणि निवडीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ते लोकशाहीतील मूलभूत स्वातंत्र्यावर परिणाम करणारे ठरू शकते. धर्मांतरविरोधी विधेयकाभोवती निर्माण होणारे सामाजिक वातावरणही महत्त्वाचे आहे. लव्ह जिहाद सारख्या संकल्पनांच्या माध्यमातून समाजात भीती आणि संशयाचे वातावरण तयार केले जाते. समाजशास्त्रात याला चौरस्त्र झरपळल असे म्हटले जाते. एखाद्या मुद्द्याला अतिशयोक्तिपूर्ण स्वरूप देऊन समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण केली जाते. याचा परिणाम असा होतो की आंतरधर्मीय विवाह आणि नातेसंबंधांकडे संशयाने पाहिले जाते.

ही परिस्थिती व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यावर सामाजिक आणि राजकीय नियंत्रण वाढवते. परिणामी, समाजात ध्रुवीकरण वाढते आणि सामाजिक सलोखा धोक्यात येतो.स्त्रियांच्या संदर्भात या विधेयकाचे विश्लेषण अधिक गुंतागुंतीचे ठरते. अनेकदा असे गृहीत धरले जाते की स्त्रियांना फसवून किंवा दबाव टाकून धर्मांतर केले जाते.

त्यामुळे त्यांचे संरक्षण करण्यासाठी कायदे आवश्यक आहेत, असा युक्तिवाद केला जातो. परंतु हा दृष्टिकोन पितृसत्ताक आहे. तो स्त्रीला स्वतंत्र निर्णयक्षम व्यक्ती म्हणून न पाहता तिच्या निवडीवर संशय घेतो. आधुनिक समाजात स्त्री ही स्वायत्त आणि सक्षम व्यक्ती आहे. तिच्या निवडीचा आदर करणे आवश्यक आहे. अन्यथा, धर्मांतरविरोधी कायदे स्त्रियांच्या संरक्षणाच्या नावाखाली त्यांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे ठरू शकतात. कायद्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भातही अनेक प्रश्न निर्माण होतात.

धर्मांतरविरोधी कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वैयक्तिकवाद, कौटुंबिक तणाव किंवा सामाजिक दबाव यामुळे खोटे आरोप लावले जाऊ शकतात. माध्यमांची भूमिकादेखील या संदर्भात महत्त्वाची ठरते. माध्यमे समाजातील विचारप्रवाह घडवतात. जरमाध्यमांनी या विषयाला सनसनाटी स्वरूप दिले, तर समाजात भीती आणि गोंधळ वाढतो. त्यामुळे या विषयावर संतुलित, तथ्याधारित आणि जबाबदारीने चर्चा होणे आवश्यक आहे. धर्मांतरविरोधी विधेयकाचा सामाजिक सलोख्यावर होणारा परिणामही गंभीर आहे. जर हा कायदा विशिष्ट समुदायांविरुद्ध वापरला गेला किंवा तसे भासवले गेले, तर समाजात अविश्वास निर्माण होतो. यामुळे सामाजिक विभाजन वाढते आणि समाजातील ऐक्य धोक्यात येते. तथापि, या विधेयकाच्या समर्थनार्थ दिले जाणारे मुद्दे पूर्णपणे नाकारता येत नाहीत. जबरदस्तीने किंवा फसवणुकीने धर्मांतर होणे ही गंभीर बाब आहे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. परंतु प्रश्न असा आहे की, या उद्देशासाठी तयार केलेले कायदे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर किती मर्यादा आणतात. लोकशाही व्यवस्थेत व्यक्तीला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार असतो. हा अधिकार तिच्या अंतःकरणाशी संबंधित असतो. त्यामुळे धर्मांतराचा प्रश्न हा अत्यंत संवेदनशील आहे आणि त्यावर नियंत्रण ठेवताना अत्यंत संतुलन राखणे आवश्यक आहे. धर्मांतराचा प्रश्न हा केवळ धार्मिक नसून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशीही जोडलेला आहे. त्यामुळे या प्रश्नाचे समाधान केवळ कायद्याद्वारे होऊ शकत नाही. सामाजिक विषमता, शिक्षणाचा अभाव, आर्थिक असुरक्षितता आणि सांस्कृतिक भेदभाव यांसारख्या मूलभूत समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शेवटी, महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 हा केवळ कायद्याचा विषय नसून तो समाजातील मूल्यांचा, स्वातंत्र्याचा आणि सत्तासंबंधांचा प्रश्न आहे. एका बाजूला जबरदस्तीचे धर्मांतर रोखणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला व्यक्तीच्या निवडीचा आणि स्वातंत्र्याचा आदर राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाज म्हणून आपण भीती आणि नियंत्रण यांवर आधारित व्यवस्था निर्माण करतो की स्वातंत्र्य, विश्वास आणि समानतेवर आधारित समाज उभारतो हा मूलभूत प्रश्न या विधेयकाच्या चर्चेतून पुढे येतो. म्हणूनच, याविषयावर विचार करताना केवळ कायद्याच्या चौकटीत न राहता व्यापक सामाजिक वास्तव, ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि लोकशाही मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे. संतुलित, संवेदनशील आणि विवेकी दृष्टिकोन स्वीकारणे ही या चर्चेची खरी गरज आहे.

# शहीद दिन : अमर बलिदानाची प्रेरणादायी गाथा



२३ मार्च हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण, हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी असा दिवस म्हणून नोंदवला गेला आहे. या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन तरुण क्रांतिवीरांनी आपल्या आयुष्याचा सर्वात मौल्यवान ठेवा आपले प्राण भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. त्यांच्या या बलिदानाने संपूर्ण देशाला एक नवी दिशा दिली आणि स्वातंत्र्यलढ्याला अधिक तीव्र गती प्राप्त करून दिली. म्हणूनच हा दिवस केवळ शोक व्यक्त करण्याचा नाही, तर देशभक्ती, त्याग आणि स्वाभिमान यांचा जागर करणारा दिवस आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा अनेक शतकांच्या संघर्षाचा परिपाक होता. परकीय सत्तेच्या जोखडाखाली दबलेल्या भारतभूमीला स्वातंत्र्याची आस लागली होती. अनेकांनी विविध मार्गांनी या लढ्यात सहभाग घेतला. काहींनी अहिंसेचा मार्ग स्वीकारला, तर काहींनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग निवडला. या सर्व प्रयत्नांचा उद्देश एकच होता तो म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे. या पार्श्वभूमीवर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते.

भगतसिंग यांचे बालपण देशभक्तीच्या वातावरणात गेले. त्यांच्या कुटुंबात स्वातंत्र्यलढ्याची परंपरा होती. लहानपणापासूनच त्यांनी देशासाठी काहीतरी मोठे करण्याचा निर्धार केला होता. जालियनवाला बाग हत्याकांडाने त्यांच्या मनावर खोल परिणाम केला. त्या अमानुष घटनेने त्यांच्या अंतःकरणात ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र संताप निर्माण केला. त्यांनी शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक संघटनांमध्ये प्रवेश केला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन अर्पण करण्याचा संकल्प केला.

राजगुरू हे अत्यंत धाडसी आणि साहसी होते. त्यांच्या नेमबाजीचे कौशल्य अतुलनीय होते. त्यांनी आपल्या कौशल्याचा उपयोग देशाच्या स्वातंत्र्यासाठी केला. त्यांची निष्ठा आणि धैर्य पाहून सहकारी क्रांतिकारक त्यांच्यावर विश्वास ठेवत. सुखदेव हे बुद्धिमान आणि संघटन कौशल्य असलेले होते. त्यांनी युवकांना एकत्र आणून क्रांतीचा पाया मजबूत केला. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा मिळाली.

लाला लाजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांनी सॉंडर्सचा वध केला. हा केवळ बदला नव्हता, तर तो अन्यायाविरुद्धचा एक ठाम प्रतिकार होता. या कृतीने ब्रिटिश सत्तेला स्पष्ट संदेश दिला की भारतीय तरुण अन्याय सहन करणार नाहीत. या घटनेने संपूर्ण देशात एक नवा उत्साह निर्माण झाला.

यानंतर त्यांनी केंद्रीय विधानसभेत बॉम्ब टाकण्याची योजना आखली. या कृतीमागील उद्देश हिंसाचार नव्हता, तर ब्रिटिश सत्तेला जागृत करणे हा होता. त्यांनी बॉम्ब टाकल्यानंतर पळून जाण्याऐवजी स्वतःहून अटक दिली. या कृतीने त्यांच्या धैर्याचे आणि प्रामाणिकतेचे दर्शन घडले. त्यांनी न्यायालयात आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

कारागृहात असताना त्यांनी कैद्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांनी उपोषण करून अन्यायकारक वागणुकीचा निषेध केला. त्यांच्या या संघर्षामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या समस्येकडे वेधले गेले. त्यांनी आपल्या शरीराला त्रास सहन करूनही आपले तत्त्व सोडले नाही. भगतसिंग हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते एक विचारवंतही होते. त्यांनी समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्याय यांविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या लेखनातून त्यांच्या विचारांची प्रगल्भता दिसून येते. त्यांनी युवकांना जागृत करण्याचे कार्य केले.

२३ मार्च १९३१ रोजी या तिघांना फाशीची शिक्षा देण्यात आली. ही शिक्षा नियोजित वेळेपेक्षा आधी देण्यात आली, जेणेकरून जनतेचा उद्रेक टाळता येईल. पण त्यांच्या मृत्यूने उलट जनतेचा संताप अधिक वाढवला. त्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा मिळाली.

या तिघांच्या बलिदानामुळे भारतीय समाजात एक नवीन चेतना निर्माण झाली. त्यांनी दाखवून दिले की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्याग आणि संघर्ष आवश्यक आहे. त्यांच्या जीवनातून आपल्याला देशप्रेम, धैर्य आणि निष्ठा यांचे महत्त्व समजते.

आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज आहे. समाजात वाढत चाललेली असमानता, अन्याय आणि भ्रष्टाचार यांविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा आवश्यक आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आपले जीवन अर्पण केले, ती मूल्ये जपणे ही आपली जबाबदारी आहे.

शहीद दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण त्यांच्या बलिदानाचा सन्मान कसा करतो, हे महत्त्वाचे आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे, समाजासाठी कार्य करणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलिदान हे भारतीय इतिहासातील अमर अध्याय आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत आहोत. त्यांच्या स्मृती सदैव आपल्या हृदयात जिवंत राहतील.

आजच्या तरुण पिढीने त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अत्यंत तरुण वयात जे कार्य केले, ते अभूतपूर्व आहे. त्यांनी व्यक्तिगत सुखाचा त्याग करून राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. त्यांच्या या त्यागातून आपल्याला प्रेरणा मिळते.

स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सतत जागरूक राहणे आवश्यक आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि असमानता यांविरुद्ध लढणे हीच खरी देशभक्ती आहे. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या आदर्शांचे पालन करून आपण समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ शकतो.

शेवटी, या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे पालन करण्याचा संकल्प केला पाहिजे. त्यांच्या बलिदानाची ज्योत आपल्या हृदयात सदैव प्रज्वलित ठेवली पाहिजे. हाच त्यांच्या प्रति खरा आदर आणि कृतज्ञतेचा भाव ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# टेंभुर्णीत दिवसाढवळ्या घरफोडी २.६३ लाखांची रोकड लंपास

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी शहरात दिवसाढवळ्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २ लाख ६३ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

टेंभुर्णीत दिवसाढवळ्या घरफोडी; २.६३ लाखांची रोकड लंपास या घटनेत शिवगौरी अपार्टमेंटच्या पाठीमागे राहणारे व कुल्फी बनविण्याचा व्यवसाय करणारे समाधान सुरेश जाधव यांच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारला. दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी १.०० ते सायंकाळी ६.४५ या वेळेत जाधव हे बाहेर असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे दरवाज्याचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

यानंतर घरातील बेडरूममध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाची उचकटापाचक करून त्यामधील रोकड चोरून नेण्यात आली.



चोरीस गेलेल्या रकमेत ५०० रुपयांच्या ४४० नोटा, २०० रुपयांच्या १५० नोटा व १०० रुपयांच्या १३० नोटांचा समावेश असून, एकूण २,६३,००० रुपये लंपास करण्यात आले आहेत. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि गणेश चौधरी करीत आहेत.

दरम्यान, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई सुरू केल्याने अनेकांनी धसका घेतला आहे. मोडनिंब येथील बारवर टाकलेला छापा, जुगार अड्ड्यांवर कारवाई, तसेच विविध अवैध प्रकारांवर अंकुश आणण्याचे प्रयत्न सुरू असतानाच शहरात चोरीच्या घटना वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. एसटी स्टँड परिसरातील चोरी, महिलांच्या गळ्यातील दागिन्यांची हिसकावणी, पॉकेटमारी, शेतातील डाळिंब चोरी, मोटारीतील तांब्याच्या वायर व इंधन चोरी यांसारख्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### पेट्रोलिंग वाढवण्याची मागणी

टेंभुर्णी शहर व परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. सायंकाळच्या वेळेस काही ठिकाणी पोलिसांची गस्त दिसत असली तरी अनेक भागात मध्यरात्री पोलिसांची गाडी फिरताना दिसत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी शहरात नियमित व प्रभावी पेट्रोलिंग वाढवावे, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

# माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांचे हस्ते आधार संच वितरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सध्याच्या संगणकाच्या युगात आधार ही मूलभूत ओळख असून आधार क्रमांकाविना कोणतेही शासकीय कामकाज होत नाही. यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने सुधारित सॉफ्टवेअर तयार करून आधार केंद्रांना अडचणींना सामोरे जावे लागू नये म्हणून अद्यावत आधार संच तयार करण्यात आल्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री अँड. आशिष शेलार यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या वतीने आधार संच वितरण कार्यक्रम शुक्रवार पेठ येथे ठेवण्यात आला होता. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात पाच आधार केंद्रांना आधार संचचे वितरण करण्यात आले.

मंत्री ॲड. शेलार यांनी पुढे सांगितले की, शासनाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून १००० सेवा थेट नागरिकांच्या व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील १३१ आधार केंद्रांपैकी १०६ किट वितरित झाले असून, प्रतिनिधिक स्वरूपात पाच किट आज देण्यात आले. उर्वरित २५ किट एप्रिल-मे महिन्यात वितरित करण्यात येणार आहेत.



उत्तर तहसीलदार निलेश पाटील यांनी आधार संचाबद्दल माहिती देऊन सांगितले की, या किटमुळे आधार नोंदणी करताना कमीत कमी अडचणी येतील आणि कामकाज अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास आमदार सुभाष देशमुख, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शहाजी पवार, मोहन डांगरे, तहसीलदार निलेश पाटील तसेच इतर पदाधिकारी, आधार केंद्र चालक व कर्मचारी उपस्थित होते.

# स्टार्टअप्सना बळकटी देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबवा- रोहन सुरवसे-पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात स्टार्टअप क्षेत्राला चालना देण्यासाठी ह्यनवीन स्टार्टअप व नाविन्यता धोरण २०२६ह्न जाहीर केले असून पुढील पाच वर्षांत ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या धोरणाची माहिती नवउद्योजकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी, यासाठी जनजागृती व मार्गदर्शन मोहीम राबविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे-पाटील यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



यासंदर्भात, पुणे शहर व जिल्ह्यातील नवउद्योजकांना शासनाच्या विविध उद्योग योजनांची माहिती व्यापक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच जनजागृती मोहीम राबविण्यात येईल, असे आश्वासन उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी दिले आहे.

पुणे जिल्हा हा औद्योगिक, शैक्षणिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात वेगाने विकसित होत असून मोठ्या प्रमाणावर युवक-युवती, महिला तसेच ग्रामीण भागातील नागरिक उद्योग व स्वयंरोजगाराकडे वळत आहेत. मात्र, शासनाच्या विविध योजनांची पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेक इच्छुक उद्योजक या संधींपासून वंचित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा उद्योग केंद्राच्या (DIC) माध्यमातून पीएमईजीपी (PMEGP), मुद्रा योजना, महिला उद्योजकता योजना आणि स्टार्टअप इंडिया यांसारख्या योजनांची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले अनुदान, बँक कर्ज, तांत्रिक सहाय्य आणि परवानगी प्रक्रियेबाबत एकाच ठिकाणी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला आहे.

महिला बचत गट आणि महिला उद्योजकांसाठी विशेष प्रशिक्षण व अनुदान कार्यक्रम राबविणे, तसेच ग्रामीण व शहरी भागात मार्गदर्शन शिबिरे आणि कार्यशाळा आयोजित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय सोशल मीडिया, स्थानिक वृत्तपत्रे आणि एफएम रेडिओच्या माध्यमातून योजनांची माहिती व्यापक प्रमाणात प्रसारित करण्याचे सुचविण्यात आले आहे.

शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी एकात्मिक हेल्पडेस्क उभारणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाइन मार्गदर्शन व अर्ज प्रक्रियेस सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या उपक्रमांमुळे पुणे जिल्ह्यातील युवक-युवती, महिला आणि ग्रामीण भागातील नागरिकांना उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन मिळून स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# सिंहगड पब्लिक स्कूल येथे अकरावी विज्ञान प्रवेशाला सुरुवात

## CET, JEE, NEET ची मोफत तयारी उपलब्ध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव (ता. उत्तर सोलापूर) येथे शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी इयत्ता अकरावी विज्ञान शाखेचे नियमित वर्ग उत्साहात सुरू झाले आहेत. यंदा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची संपूर्ण मोफत तयारी करून देण्याचा महत्त्वपूर्ण



उपक्रम राबविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून संस्थेमार्फत CET, JEE आणि NEET या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन नियमित अध्यापनासोबत दिले जाणार आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण तयारी विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी ठरणार आहे.

अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली संकल्पनाधारित अध्यापन, नियमित सराव परीक्षा, मार्गदर्शन सत्रे तसेच स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच स्पर्धात्मक परीक्षांमध्येही यश मिळविण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी पालकांनी व विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव (सोलापूर) चे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी केले आहे.

# रमजान ईद निमित्त संभाजी ब्रिगेड च्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्पाचे वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रमजान ईदच्या पवित्र सणाच्या प्रसंगी सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वाढवण्यासाठी संभाजी ब्रिगेड च्या वतीने होटगी रोडवरील ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन रमजान ईद सणाच्या 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देण्यात आल्या. गुलाब हे प्रेमाचे आणि आदराचे प्रतीक मानले जाते त्यामुळे रमजान ईद सणाच्या निमित्ताने सामाजिक सलोखा निर्माण होऊन समुदायांमध्ये प्रेम, एकता आणि



बंधुभावाची भावना वाढवण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले जिल्हा संघटक तेजस शेळके सचिन होनमाने सिद्धू जगताप दिलीप भोसले संतोष सुरवसे आदी उपस्थित होते.

## वात्रटिका

### रोज नवा विडिओ

कुणाचा संसार तर
कुणाचे करिअर संपले...
धाकधुकीत आहेत कोणी
ज्यांना कँप्टन वाटले आपले...
उत्सुकता आहे सगळ्यांना
फाईलीत काय काय दडले...
दुखनं दाखवता येईना असं
विचित्र कारस्थान घडले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' योजनेस मंत्रीमंडळाची मान्यता

## लोकसहभागातून आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' या अभियानास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. १ एप्रिलपासून ३१ मार्चपर्यंत राज्यभर हे अभियान राबविण्यात येणार आहे. गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्सनात्मक आरोग्य सेवाना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल, व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्दीष्ट आहे. लोकसहभागातून आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार यवतमाळ जिल्ह्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य सुदृढ राहावे आणि आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी या मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे.

या अभियाना अंतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, जीवनशैली , जलजन्य आजारांचे नियंत्रण आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दजेर्दार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. 'माझं गाव आरोग्यसंपन्न गावह्व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असुन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निदेर्शानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अभियानासाठी सुमारे 80.75 कोटी रुपये निधी मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. माझं गाव आरोग्यसंपन्न गाव ही योजना म्हणजे केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे. सदर योजना ही सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांचे मार्गदर्शनाखाली राबविली जाणार असून त्याबाबतची व्हीसीद्वारे सभेचे आयोजन करण्यात आले असून सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांना याबाबत सूचना दिल्या आहेत.

# झेडपीचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी साधला परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिष्यवृत्तीचा टक्का वाढावा यासाठी जिल्हा परिषदेकडून आयोजित केलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेला रविवारी आठ हजार विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन केंद्रावरील परिस्थितीचा आढावा घेतला.

दरवर्षी होत असलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषदेमधील विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने इयत्ता तिसरी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी म्हणून जिल्ह्यातील 40 केंद्रावर प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी 11 ते दुपारी एक या वेळेत परीक्षा झाली. परीक्षा सुरू असल्याची माहिती मिळताच जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी बाळे येथील राजीव प्राथमिक शाळा येथील केंद्राला भेट देऊन परीक्षेचा आढावा घेतला. यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख, उपगटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, विस्तार अधिकारी सुदर्शन राठोड, केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, मुख्याध्यापक मोहन घोडके, विश्वकृपा विद्या प्रतिष्ठानचे अमोल ढेपे आदी उपस्थित होते.

**उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करणार**

प्रज्ञाशोध व शिष्यवृत्ती परीक्षेत चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व भेटवस्ते देऊन जिल्हा परिषदेच्या वतीने गौरव करण्यात येणार असल्याचे इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांशी साधला संवाद..

इंद्रजीत पवार यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्यानंतर विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. परीक्षा लिहित असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ जाऊन, डेस्कवर बसून त्यांनी आपुलकीने विचारपूस केली.


## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज. नं./ २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

आयेशा अ. गनी मिर्झा वय -३५ वर्षे. धंदा- गृहिणी रा. मार्डी ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची आयेशा अ. गनी मिर्झा जन्म दि.७/४/१९९१ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आयेशा अ. गनी मिर्झा यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे एप्रिल १९९१ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/०४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २०/३/२०२६

**हुकुमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज. नं./ २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

बापू सिदू वाघमारे वय-४७ व्यवसाय- शेती रा. शेटफळ ता.मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रापंचायत शेटफळ ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा माऊली बापू वाघमारे यांचा जन्म दि.२८/९/२००६ रोजी शेटफळ ता.मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे माऊली बापू वाघमारे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेबर २००६ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.५/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २०/३/२०२६

**हुकुमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज. नं./ २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

जुबेदा दस्तगीर शेख जुबेदा उमर शेख (लग्ना नंतरचे नाव ) वय - ६७ व्यवसाय- गृहिणी रा. मोहोळ ता.मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रापंचायत बिटले ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार जुबेदा दस्तगीर शेख यांचा जन्म दि. १/६/१९५९ रोजी बिटले ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे जुबेदा दस्तगीर शेख यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९५९ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २०/३/२०२६

**हुकुमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज. नं./ २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

शाईन नसीम शिकलकर शाईन एजाज शिकलगार (लग्ना नंतरचे नाव ) वय -३० वर्षे. धंदा- गृहिणी रा. विटा ता. खानापूर जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची शाईन नसीम शिकलकर जन्म दि.२४/६/१९९६ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील शाईन नसीम शिकलकर यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९९६ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/०४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २०/३/२०२६

**हुकुमावरुन**


# नुकसानग्रस्त पिकांच्या भरपाईसाठी प्रयत्न करणार- आ. डॉ. देशमुख



**पंचनामे करण्याची मागणी सांगोला तालुक्यातील** शेतकऱ्यांना अवकाळी पावसाने झोडपल्याने डाळिंब, द्राक्ष, केळी, आंबा, पेरू यासह इतर फळबागांचे आणि ज्वारी, मका, गहू तसेच पालेभाज्या यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके व फळबागा हातातून जाण्याची चिन्हे दिसू लागल्याने शेतकरी आता मोठ्या संकटात सापडला आहे. नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य चेतनसिंह केदार - सावंत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तहसीलदार बाळूताई भागवत यांच्याकडे केली आहे.

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील जुनोनी, कोळा आदी भागाला गारपिटीने झोडपून काढल्याने रब्बी हंगामातील काढणीला आलेली पिके तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा, आधार देण्यासाठी आमदार अधिकाऱ्यांसमवेत डॉ. बाबासाहेब देशमुख हे शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन चौकशी करून नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

बुधवारी, सायंकाळी साडेसहा ते साडेसात वाजण्याच्या सुमारास सांगोला शहरासह तालुक्यातील जुनोनी, कोळा, किडबिसरी, गोडवाडी, राजुरी, मेडशिंगी, डिकसळ, अचकदानी, महूद आदी गावांत मेघगर्जना, वादळ वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपले. काही भागात मोठमोठ्या गाराही पडल्या. सध्या रब्बी हंगामातील ज्वारी, गहू आदी पिकांची काढणी चालू असताना मोठा पाऊस झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हवामान खात्याने सूचना दिली असतानाही सर्व पिके आणून कोठे ठेवायची असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा होता. तालुक्यातील शेतकऱ्यांची वर्षाच्या रोजीरोटीचा प्रश्न या धनधान्यावर अवलंबून असतो, तोच निसगार्ने तोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला होता. आमदार डॉ. देशमुख हे तातडीने अधिवेशनातून परत येऊन तहसीलदार बाळूताई भागवत, कृषी अधिकारी दीपाली जाधव, जिल्हा परिषद सदस्य किरण पांढरे, पंचायत समिती सदस्य अमृत पाटील, सोपान कोळेकर, सरपंच राजू पाटील आदींसमवेत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. तसेच शासनाने तातडीने पंचनामे करून भरघोस मदत करावी, अशी मागणी आमदार डॉ. देशमुख यांनी केली. विधानसभेतही प्रश्नउपस्थित करून तातडीने मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

द्राक्ष, डाळिंबाच्या बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तालुक्यात मोठ्या प्रमाणात आंब्याच्या झाडाची लागवड झालेली आहे. सध्या आंब्याच्या झाडावर लहान लहान कैऱ्या व काही ठिकाणी मोठे आंबे असून गारपिटीमुळे ते सर्व खाली गळून पडले आहेत. फळबागांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याने फळ उत्पादक शेतकरी ऑक्सिजनवर आहे. गहू हे पीक भुईसपाट झाले असून ज्वारीचे पीक आडवे झाले आहे. सदर नुकसानीची माहिती आमदार डॉ. देशमुख यांनी त्वरित दूरध्वनीद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिली.


## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता,
### यांत्रिकी विभाग,सोलापूर, कुमठा नाका,उजनी वसाहत, सोलापूर-४१३००३.

Email ID- eemdsolapur@gmail.com, दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २९९०७१४

### ई-निविदा सूचना क्रमांक ३९ सन २०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत, सविस्तर निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये (जी.एस.टी. व विमा वगळून) |
|---|---|---|---|
| १ | उजनी डावा कालवा वरील कारंबा शाखा कालवा वरील साखळी सोलापूर क्रमांक ३४/१४०,३८/७५०,४५/६०० व ६३/२८५, ४९/२७० वरील सीआर/एस्केप व्दारे दुरुस्ती करणेबाबत. | सोलापूर | रु.४०,३६,४०५/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २५/०३/२०२६ (११ सकाळी) पासून ते दिनांक ०२/०४/२०२६ (सायंकाळी १८.००)

ई-निविदा उघडण्याचा दिनांक :- ०६/०४/२०२६ (१२ सकाळी)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण / १२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण - ०५२३ /(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७ /प्र.क्र. २४७/१७ दि. १८/१० / २०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

http://mahatenders.gov.in (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.). निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर./लेखा-२/निविदा/६५८/सन २०२६.
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांचे कार्यालय
दिनांक :- १२/३/२०२६.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/४०२/२५-२६



## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

**एस. आर. एन. क्रमांक:** SLP/००४५३/१८/२६
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक** ३१९/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री सदगुरु बाळूमामा चॅरिटेबल ट्रस्ट निंबोणी बाबत ।
न्यासाचा पत्ता :- अट पोस्ट निंबोणी, टालुक मंगल्वेदा, डिस्ट्रिक्ट सोलापूर, सोलापूर, मंगळवेढे, निंबोनी अर्जदार दाजी नागु देवकते, } **अर्जदार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत: रोख रु. ०/- मात्र
( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०३-२०२६ रोजी दिली ।

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर**



# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# शिक्षकांना शिस्त लावा; शाळेत थांबण्याची सक्ती करा - दीपक वैद्य




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी शिक्षणाधिकारी कादर शेख यांना प्राथमिक शाळेतील शिक्षकांना शिस्त लावण्याच्या सूचना केल्या.

शाळेच्या वेळेत शाळेतच थांबावे, त्यांची कामे शाळेच्या वेळेनंतर करावीत, असे सांगत जे शिक्षक मुख्यालयात (ज्या ठिकाणी नियुक्ती आहे) राहत नाहीत, अशा शिक्षकांची यादी सभेत सादर करण्याच्या सूचना केल्या. यावर शिक्षणाधिकारी शेख यांच्याकडे हो म्हणण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष-उपाध्यक्ष आज पहिल्याच दिवशी अभ्यासासह अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून सत्कार स्वीकारण्यात व्यस्त होते. अधिकारी, कर्मचारी, कर्मचारी संघटना सत्कार करत सहकार्य करण्याचे आश्वासन देत होते. याच वेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्यासह शिक्षण विभागाच्या पूर्ण टीमच्या वतीने अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष पवार यांचा सत्कार झाला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे २) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा ५) कोकणातील एक स्ट्राँग नेते ६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत) १०) ग्रॅज्युएट (मराठीत) १२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत) १६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क ३०) याचे कणीस भाजून खातात ३१) उत्सवाचा दिवस ३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख ४१) वाट, मार्ग (हिंदीत) ४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :** १) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ ५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष ८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत ११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत १४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त १८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है २२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार २५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो २८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द ३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत) ३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ ४०) चित्त, ध्यान, लाख ४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४४) दहा गुणिले सात ४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 206

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 7 | | 1 | | | 6 |
| | | | 6 | 9 | | | 1 | |
| | 9 | 6 | | 8 | | | 5 | 3 |
| 9 | 8 | 4 | | | | | | |
| 2 | | | | | | 6 | 4 | |
| 6 | | 3 | | | 5 | 8 | | |
| | 7 | 8 | | 1 | 4 | 9 | | |
| 4 | 2 | | 3 | 6 | 7 | | | 5 |
| 5 | | 1 | | | 9 | 3 | | 4 |

# पाण्याची तहान भागविणे हे महान कार्य- रत्नपारखी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजाची पाण्याची तहान भागविणे हे महान कार्य आहे. अत्यंत प्रामाणिक कंडक्टर रामचंद्र आवताडे यांच्या स्मरणार्थ हा समाज उपयोगी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला जात आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून असे उपक्रम आवताडे परिवाराकडून राबविले जात असून हे निश्चित सर्वांसाठीच प्रेरणादायी कार्य आहे, असे प्रतिपादन उद्योजक जयदीप रत्नपारखी यांनी केले. मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव येथील कै. रामचंद्र विठोबा आवताडे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने स्वच्छ पाण्याचा नितळ उपक्रमाअंतर्गत सोलापूर श्रमिक पत्रकार संघात आर.ओ. फिल्टर पाणी मशीनचा उद्घाटन समारंभ



आज उद्योजक जयदीप रत्नपारखी आणि मोना रत्नपारखी यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील हे होते. यावेळी विचारमंचावर एक्साईज विभागाचे पोलीस उपनिरीक्षक अंकुश आवताडे, कै. रामचंद्र विठोबा आवताडे बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा सपना आवताडे, खजिनदार ब्रह्मदेव माने, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीस उपनिरीक्षक अंकुश आवताडे म्हणाले, वडील कै. रामचंद्र आवताडे यांनी एसटी महामंडळात कंडक्टर म्हणून अनेक वर्ष प्रामाणिकपणे सेवा बजावली होती. त्यांच्या कार्याचा आदर्श वारसा पुढे ठेवत एसटी कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांसाठी एसटी स्टँडवर शुद्ध पाण्याची सोय हा उपक्रम आतापर्यंत चार ठिकाणी राबविला आहे. पत्रकार बांधवांसाठीही पाणी फिल्टर मशीन सोय केली आहे. समाजाच्या व्यथा, वेदना, अडचणी जाणून त्या सोडविण्यासाठी संस्था प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात काशिनाथ पाटील यांनी समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही जाणीव ठेवून वडिलांच्या स्मरणार्थ आवताडे परिवाराने हा स्तुत्य उपक्रम राबविला आहे, ही सर्वांसाठी प्रेरक बाब आहे. यावेळी अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उपाध्यक्ष आफताब शेख यांनी केले. सूत्रसंचालन मंगेश लामकाने यांनी केले तर सरचिटणीस सागर सुरवसे यांनी आभार मानले.

# प्रेम, शांतता आणि भाईचाऱ्याचा संदेश देत अक्कलकोटमध्ये ईदचा उत्सव साजरा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. शहरासह ग्रामीण भागातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने एकत्र येत सामुदायिक नमाज पठण करून अल्लाहकडे



सुख, शांती आणि भाईचाऱ्याची प्रार्थना केली. सकाळी सुमारे ८:३० वाजल्यापासूनच मुस्लिम बांधव ईदगाह मैदानावर दाखल होऊ लागले. नवीन कपडे, सुगंधित इत्र आणि डोळ्यांत सुरमा लावून सर्वांनी अत्यंत श्रद्धेने नमाज अदा केली. ईदगाह परिसरात एकतेचे आणि भक्तीचे सुंदर चित्र पाहायला मिळाले.

# अध्यात्मिक उर्जा, एकतेचा संदेश आणि इंसानियतची शिकवण, सोलापुरात ईदचा मंगल उत्सव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील ईदगाह मैदानावर रमजान ईदनिमित्त आज पहाटेपासूनच श्रद्धा, शांतता आणि एकतेचे अत्यंत भावपूर्ण चित्र पाहायला मिळाले. शेकडो मुस्लीम बांधवांनी एकत्र येत सामूहिक नमाज अदा केली आणि 'सर्वांसाठी सुख-शांती' अशी प्रार्थना अल्लाहकडे मागितली.



महिनाभर चाललेल्या संयम, त्याग आणि आध्यात्मिक साधनेनंतर आलेल्या ईदने शहरात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण केले. रोजे पाळत, कुरआन पठण करत आणि आत्मशुद्धी साधत मुस्लीम बांधवांनी या पवित्र महिन्याचा अर्थ जपला. त्याचबरोबर जकात आणि फित्रा देत गरजू व वंचित घटकांनाही सणाचा आनंद मिळावा याची जाणीवपूर्वक काळजी घेतली गेली.

ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सामूहिक नमाजानंतर एकमेकांना मिठी मारत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छांची देवाणघेवाण झाली. या क्षणांतून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि आपुलकीचे जिवंत दर्शन घडले.

होटगी रोड परिसरातील आलमगीर ईदगाह येथे शहर काझी मुफ्ती सय्यद अमजदअली यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. तसेच आसार मैदान ईदगाह येथे सकाळी १०:३० वाजता नमाज पार पडली. रंगभवन येथील अहले हादिस ईदगाहमध्ये सकाळी ७:३० वाजता हजारो मुस्लिम बांधव एकत्र आले होते, येथे मौलाना ताहेर बेग यांनी नमाज पठण केली.

पांगल मैदानातील शाही आलमगीर ईदगाह येथे सकाळी ९ वाजता नमाज अदा करण्यात आली. मौलाना सय्यद अहमद गौरी हैद्राबादी यांनी नमाजानंतर सामूहिक प्रार्थना केली. जुनी मिल कंपाऊंड येथील ईदगाहमध्येही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नवीन कपडे, सुगंधित इत्र आणि डोळ्यांत सुरमा लावून लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण ईदच्या आनंदात सहभागी झाले होते. येथे मोहम्मद सय्यद फजुलूल्लाह खतीब यांनी नमाज अदा केली.

नमाजानंतर सर्वत्र गळाभेटी, शुभेच्छा आणि आपुलकीचा वर्षाव पाहायला मिळाला. अनेकांनी एकमेकांना घरी येण्याचे निमंत्रण देत पारंपरिक सुरकुर्मा आणि गुलगुले यांचा आस्वाद घेण्याचा आग्रह केला.

**या पवित्र सणानिमित्त विविध धर्मगुरूंनी समाजाला मौलिक संदेश दिले.**

**'समानता, क्षमा आणि मानवतेचा आदर्श म्हणजे ईद'**

प्रेषित मोहम्मद यांच्या जीवनातील मक्केच्या विजयाचा प्रसंग सांगत मुफ्ती सय्यद अमजदअली यांनी क्षमा, समानता आणि बंधुभाव यांचे महत्त्व अधोरेखित केले. द्वेष सोडून प्रेम पसरवण्याचे आवाहन त्यांनी केले.

**'आपल्यातला भेदभाव आणि स्वार्थ सोडा'**

मौलाना ताहेर बेग यांनी सांगितले की, फक्त नमाज आणि रोजे पुरेसे नाहीत, तर आपल्या वर्तनातही सकारात्मक बदल दिसला पाहिजे. शेजाऱ्याच्या दुःखात सहभागी होणे हीच खरी ईद असल्याचे त्यांनी नमूद केले.

**'समाजात शांतता टिकवणे हिच खरी ईद'**

मौलाना सादिक मणियार यांनी रमजान महिन्याचा संदेश सांगताना गरजूंची मदत आणि समाजात शांतता राखणे हेच ईदचे खरे सार असल्याचे स्पष्ट केले.

**'ईदचा खरा अर्थ - इंसानियत'**

सय्यद मोहम्मद खतीब यांनी नफरत दूर ठेवून प्रेम, सहकार्य आणि एकतेने समाज घडवण्याचे आवाहन केले.

**'द्वेष आणि मत्सर टाळा, प्रेम वाढवा'**

मौलाना सय्यद अहमद गौरी यांनी इस्लामच्या शिकवणीतून प्रेम, करुणा आणि सहकार्य या मूल्यांचा संदेश देत शांततापूर्ण समाजनिर्मितीवर भर दिला.

एकंदरीत, रमजान ईदनिमित्त सोलापूर शहरात प्रेम, एकता, शांतता आणि इंसानियतचा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला. हा सण केवळ आनंद साजरा करण्याचा नसून, समाजात सौहार्द आणि परस्पर आदर वाढवण्याची प्रेरणा देणारा ठरला.

# चेतन नरोटे अपयशी शहराध्यक्ष म्हणत भाजप कार्यकर्त्यांनी डिवचले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी नुकतेच मान खटाव येथील सभापती निवडीचे बॅनर लावून, पालकमंत्र्यांना डवचिण्याचा प्रयत्न केला होता, त्याला प्रतिउत्तर आज भाजप कार्यकत्याने अपयशी शहराध्यक्ष हा मान मिळवून दिल्याबद्दल जया भाऊंचे आभार असे बॅनर लावून, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना प्रतिउत्तर दिले आहे.

या बॅनर मध्ये काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष म्हणून धुरा सांभाळल्यानंतर कशा पद्धतीने काँग्रेसची वाट लागली,

44 नगरसेवकांवरून 2 नगरसेवकांवर आलेला काँग्रेसचा उतरता क्रम असेल, मुख्यमंत्री, केंद्रीय



गृह मंत्री,विद्यमान खासदार,मध्य विधानसभा मतदारसंघात 15 वर्ष आमदार असणाऱ्या काँग्रेसचा विधानसभेला डिपॉझिट जप्त करून सुपडा साफ केल्याबद्दल अपयशी शहराध्यक्ष चेतन नरोटे यांचे अभिनंदन अशी,मजकूर असलेला बॅनर त्यांच्याच प्रभागात लावण्यात आल्याने, बॅनर वॉर सुरू झाले असल्याची चर्चा रंगली

# पडसाळी येथील द्राक्ष पिक नुकसानीची ॲड. शेलार यांच्या कडून पाहणी व नुकसानग्रस्तांशी संवाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे पडसाळी येथे अवकाळी पावसामुळे झालेल्या द्राक्ष पिकाच्या नुकसानीची पाहणी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. मंत्री शेलार यांनी



प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची स्थिती पाहिली आणि शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी श्री. शहाजी पवार तसेच तहसीलदार निलेश पाटील उपस्थित होते.

त्यांनी नुकसानीबाबत प्राथमिक माहिती दिली. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासनही देण्यात आले. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पाहणी दौऱ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये दिलासा निर्माण झाला असून शासन त्यांच्या पाठीशी उभे राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# मनोरमा बँक परिवाराच्या वतीने गुरुवारी रामनवमीनिमित्त गीतरामायण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील मनोरमा को-ऑपरेटिव बँक आणि मनोरमा मल्टीस्टेट यांच्या वतीने गुरुवार दिनांक 26 मार्च 2026 रोजी गंधार प्रतिष्ठान प्रस्तुत ग. दि. माडगूळकर लिखित गीत रामायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मनोरमा बँकेचे चेअरमन माननीय श्रीकांत मोरे यांनी दिली.



हुतात्मा स्मृती मंदिर येथे अतुल बेले आणि सहकलाकार हा कार्यक्रम सादर करणार आहेत. गुरुवारी सायंकाळी 6:15 ते रात्री दहा वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालणार असून सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन माननीय चेअरमन श्रीकांत मोरे, व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, बँकेच्या कार्याध्यक्ष सौ अस्मिता गायकवाड आणि समस्त संचालक मंडळ आणि संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रवेशिका कार्यक्रम स्थळीच देणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# सोलापुरात चिमण्यांसाठी 'कृत्रिम घरटी' कार्यशाळा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक चिमणी दिन, वन दिन, जल दिन आणि हवामान दिन यांच्या संयुक्त निमित्ताने आज सोलापुरात 'पर्यावरणीय मार्गदर्शन शिबीर व चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी कार्यशाळा' मोठ्या उत्साहात पार पडली. सोलापूर प्रादेशिक वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग, सोलापूर महानगरपालिका, 'माझी वसुंधरा' अभियान आणि 'वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**पुढच्या पिढीचा निसर्गाशी संवाद**

स्मृती उद्यान येथे सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे मुलांचा आणि त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग.



पालकांनी मुलांसह चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी बनवली. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांचा अधिवास धोक्यात येत असताना, त्यांना पुन्हा आपल्या अंगणात बोलावण्यासाठी कृत्रिम घरटी कशी तयार करावीत, याचे प्रात्यक्षिक यावेळी देण्यात आले. अनेक पालकांनी आपल्या पाल्यांसह या कार्यशाळेत सहभागी होऊन स्वतःच्या हाताने घरटी तयार करण्याचा आनंद लुटला.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरच्या उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, रोहितकुमार गांगर्डे आणि उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलनकर, ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक निनाद शहा, सिद्राम पुराणिक, मुकुंद शेटे उपस्थित होते. यावेळी उपस्थित तज्ज्ञ वक्ते निनाद शहा, सिद्राम पुराणिक आणि मुकुंद शेटे यांनी उपस्थितांना बदलत्या पर्यावरणाचे महत्त्व आणि वन्यजीव संरक्षणाची गरज यावर मोलाचे मार्गदर्शन केले.

**लोकसहभागातून पर्यावरण रक्षणाचा संदेश**

केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण रक्षण कसे करता येते, हे या कार्यशाळेतून सिद्ध झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित चौहान यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. शिवानी गोटे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हउअर चे शिवानंद हिरेमठ, संतोष धाकपाडे, सचिन पाटील, विनय गोटे, अजय हिरेमठ, प्रवीण गावडे, प्रवीण जेऊरे, सिद्धांत चौहान, लखन भोगे, दिपाली भोगे, आंबादास उबाळे तर वनविभागाचे वनपाल रुकेश कांबळे, वनरक्षक अनिता शिंदे, श्रीशैल पाटील, अश्विनी सोनके, ललिता बडे, गंगाधर विभुते, रमेश कुंभार इत्यादी उपस्थित होते.

तसेच इको नेचर क्लबचे महेश देवकर, मनोज देवकर, इको फ्रेंडली क्लबचे परशुराम कोकणे, मेघा क्षीरसागर, पर्यावरणप्रेमी महेश कासट, विद्या भगरे-भोसले, मल्लिकार्जुन धुळखेडे, श्रीकांत बनसोडे, सिद्धेश्वर मिसालोल्लू, दिपक इंगळे, शांतिकुमार नागटिळक, औदुंबर गेजगे, मदन वडवेराव, अनिल जोशी यांनी पण या कार्यशाळेत आपली विशेष उपस्थिती नोंदवली. निसर्ग संवर्धनाचा हा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी असे उपक्रम मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# पोटे परिवाराच्या मानाच्या कावडीची पूजा तीसरी पिढी करते कावडीची सेवा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री शंभू महादेवाच्या मानाच्या कावडींपैकी एक पोटे परिवाराची तिसऱ्या पिढीतही अखंड सुरू असलेल्या मानाच्या कावडीची गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर महापूजा व महाआरती करण्यात आली.

चैत्र शुद्ध गुढीपाडव्यापासून ते चैत्र पौर्णिमेपर्यंत चालणारा हा पंधरा दिवसांचा उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तिभाव, परंपरा आणि धार्मिक उत्साहाचे अनोखे दर्शन घडवत आहे. या कावडीद्वारे भगवान शंभू महादेवाला चार वेळा पवित्र जलाभिषेक (धार) अर्पण केला जातो. कै. महादेव बंडू पोटे व कै. किसन बंडू पोटे यांच्या आशीवार्दातून सुरू झालेली ही कावड परंपरा पुढे



कै. बाजीराव महादेव पोटे, कै. कांतीलाल महादेव पोटे व कै. हिरालाल किसन पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली वृद्धिंगत झाली. सध्या सागर पोटे, धनंजय पोटे, सचिन पोटे, माऊली पोटे व विठ्ठल पोटे हे नव्या पिढीचे प्रतिनिधी ही परंपरा जतन करत आहेत. गुढीपाडव्यादिवशी कावडीस नवीन वस्त्र परिधान करून विधिवत महापूजा केली. तसेच सर्व भाविकांसाठी पंधरा दिवस अखंड महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून हजारो भाविक या सोहळ्यात सहभागी होत आहेत.

# माढा तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मंत्री गोगावले यांच्याकडून पाहणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** रोजगार हमी योजना व फलोत्पादन खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले यांनी माढा तालुक्यातील सुरळी व अकोले खुर्द येथे केळी, डाळिंब व पेरू उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणीच्या प्रसंगी शासन शेतकऱ्यांसोबत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी उत्पादन मंत्री श्री. गोगावले यांनी शेतकरी संतोष पाटील (डाळिंब), संजय पाटील (आंबा), ऋषिकेश पाटील (डाळिंब), मनोज काळे (पेरू) व भागवत काळे (केळी) यांच्याशी चर्चा करून रोपे खरेदी, खत-औषध फवारणी, उत्पादनानंतर व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक, बाजारभावातील चढ-उतार व



हवामानातील बदल अशा अडचणी जाणून घेतल्या. तसेच फळबाग लागवडीसाठी मिळणाऱ्या शासकीय योजना व अनुदानाबाबतही चर्चा करण्यात आली.

माढा तालुक्यातील एकूण फळबाग लागवडीखालील क्षेत्र १०,७९९.२७ हेक्टर असून त्यात डाळिंब २,२०५.४५ हेक्टर, द्राक्ष १,९९७.७० हेक्टर व केळी ३,७८९.६० हेक्टर इतके क्षेत्र आहे. उसानंतर सर्वाधिक क्षेत्र केळीचे असून, युद्धजन्य परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत.

या पाहणी दौऱ्यास आमदार अभिजीत पाटील, संजय कोकाटे, कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, तालुका कृषी अधिकारी हनुमंत बोराटे, तंत्र अधिकारी अभिजीत देडे तसेच इतर अधिकारी, पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे : मंत्री गोगावले

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अमेरिकेच्या चुकीच्या धोरणामुळे आयात-निर्यात व्यापार ठप्प झाला असून केळी उत्पादक शेतकरी पूर्णपणे अडचणीत आला आहे. उत्पादनावर खर्च जास्त असून नफा काहीच नाही. यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासोबत विशेष बैठक घेऊन ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून अधिवेशनाच्या तीन दिवसांत हा प्रश्न विधिमंडळात घेतला जाईल, अशी माहिती फलोत्पादन व रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

करमाळा व माढा तालुक्यातील फळबाग शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी टेंभुर्णी येथे केळी फळबाग शेतकरी, व्यापारी, कंपनी प्रतिनिधी यांची विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मंत्री



श्री. गोगावले मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार अभिजीत पाटील, संजय कोकाटे, कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, तालुका कृषी अधिकारी हनुमंत बोराटे, तंत्र अधिकारी अभिजीत देडे तसेच मान्यवर, अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे, तसेच केळी व द्राक्ष उत्पादकांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत सहभागी करून घेण्याबाबत चर्चा होईल. व्यापारी कंपनी व उजनी धरण पुनर्वसन संघर्ष समिती यांनी दिलेल्या निवेदनावरही विचार केला जाईल, अशी माहिती फलोत्पादन मंत्री श्री. गोगावले यांनी देऊन केळी व द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला.

माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडताना सांगितले की, ह्युद्धजन्य परिस्थिती, अतिवृष्टी, दुष्काळ यामुळे शेतकरी नेहमीच अडचणीत येतो. नाशवंत फळ ठराविक कालमयार्देत विकले गेले नाही तर मोठे नुकसान होते. तसेच पानंद रस्ते, केळी संशोधन केंद्र व प्रक्रिया उद्योग उभारणीची गरज आहे.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी जिल्ह्यातील भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेची माहिती देऊन जिल्ह्यातील फळबाग क्षेत्रात होत असलेले वाढीविषयी सांगितले. सोलापूर जिल्ह्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत युद्ध परिस्थितीमुळे केळी पिकाची निर्यात न झाल्यामुळे शेतकरी व व्यापारी अडचणीत आल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीपूर्वी मंत्री भरत गोगावले यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन फळबागांची पाहणी केली व शेतकरी, निर्यातदार, व्यापारी यांच्या व्यथा ऐकून घेतल्या.